(J.O.Code-01775)

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २६/०२/२०२१ |
| नोंदणी दिनांक | : | ०२/०३/२०२१ |
| निकाल दिनांक | : | २१/०३/२०२४ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>**०३ ०० २४** |

**तक्ता क्र.३२**
**भाग 'अ'**
(फौजदारी नियमपुस्तीका परिच्छेद क्र.४४ (i) खंड ६ नुसार)

## अहमदनगर येथील ०७ वे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी अहमदनगर यांचे न्यायालयात.

(पिठासन अधिकारी सौ. माया अ. देशमुख)

**नियमित फौजदारी खटला क्र.२९८/२०२१** **निशाणी-२४.**
(CNR NO. MHAH-0300-2047-2021)

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | : | **महाराष्ट्र सरकार,**<br>तर्फे कोतवाली पोलीस स्टेशन,<br>अहमदनगर. |
| प्रतिनिधित्व | : | अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी विधिज्ञ श्री.जी.ए. भोसले |
| आरोपी | : | **१. धनंजय संजय साबळे,**<br>वय - ३१ वर्ष, धंदा - मजुरी,<br><br>**२. संजय दगडु साबळे (मयत)**<br>वय - ६० वर्ष, धंदा - काही नाही,<br><br>**३. सविता संजय साबळे,**<br>वय - ५० वर्ष, धंदा - गृहिणी,<br>सर्व रा.भोलेनाथनगर, पंडीतनगर बसस्टॉपजवळ,<br>सिडको, जि.नाशिक. |
| प्रतिनिधित्व | : | आरोपींतर्फे विधिज्ञ श्री.एम.के. शेडाळे |

**भाग 'ब'**

(फौजदारी नियमपुस्तीका परिच्छेद क्र.४४ (ii) खंड ६ नुसार)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | : | २७/०१/२०१९ ते दि. २६/०९/२०२० |
| फिर्याद दाखल दिनांक | : | २८/१२/२०२० |
| दोषारोप दाखल दिनांक | : | २६/०२/२०२१ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | : | ०२/०८/२०२३ |
| प्रकरणात पुरावा सुरू झाल्याची दिनांक | : | ०२/०८/२०२३ |
| प्रकरणात न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची दिनांक | : | युक्तीवादानंतर लगेचच न्यायनिर्णय घोषित करण्यात आला. |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | : | २१/०३/२०२४ |
| जर शिक्षा दिली असल्यास त्याची आदेशाचा दिनांक | : | -- |

**<u>आरोपींचा तपशिल</u>**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची दिनांक | आरोपीस जामीनावर सोडल्याची दिनांक | अपराधांचे कलम | शिक्षा दिली अथवा निर्दोष मुक्तता | शिक्षेचा तपशिल. | फौ. प्र. संहिता कलम ४२८ अन्वये सुट देणेकामी कोठडीतील कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धनंजय संजय साबळे | -- | ०२/०८/२०२३ | भा. द. वि. कलम ४९८(अ), ३५४, ४२०, ४०६, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता झाली. | -- | -- |
| २. | संजय दगडु साबळे (मयत) | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- |
| ३. | सविता संजय साबळे | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- |

**<u>न्यायनिर्णय</u>**

( दिनांक : २१/०३/२०२४ )

प्रस्तुत खटला आरोपी क्र.१ ते ३ यांचे विरोधात भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४९८(अ), ३५४, ४२०, ४०६, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ या शिक्षेस पात्र

उपराधाकरिता चालविण्यात आला आहे.

## <u>अभियोग पक्षाने मांडलेली हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :

**२.** खबरदेणार अपुर्वा धनंजय साबळे हिचे लग्न आरोपी क्र.१ याच्याशी रितीरिवाजानुसार झाले होते व लग्नामध्ये तिला सर्व संसारउपयोगी वस्तु, पाच तोळे सोने व गॅस घेण्यासाठी रोख रक्कम रू.६,०००/- दिले होते. आरोपी क्र.२ व ३ हे तिचे सासु सासरे आहेत. लग्नानंतर १५ दिवस खबरदेणार हिला तिच्या सासरी सिडको, जि.नाशिक येथे चांगले नांदविले व त्यानंतर आरोपींनी 'तुझे आई वडीलांनी सर्व भंगार वस्तु दिल्या, तु वडीलांकडुन पैसे घेवुन ये, आपण दुस-या वस्तु घेवु' असे म्हणुन खबरदेणार हिची सासु तिचा राग राग करून तिला उपाशी पोटी ठेवत असे व खबरदेणार हिचे पतीचे कान भरून तिला मारहाण करण्यास सांगत असे व 'आमचे नाव कोणाला सांगायचे नाही' असा दम देत असे. खबरदेणार ही गरोदर असताना आरोपी तिला 'तु तुझे आई-वडीलांकडे जा, कारण आता दवाखाना फी, औषधे, सोनोग्राफीसाठी खुप खर्च येतो, तु तिकडेच उपचार कर' असे म्हणाले व तिला श्रीरामपुर येथे पाठवुन दिले. दवाखान्याचा सर्व खर्च खबरदेणार हिचे आई-वडीलांनी केला. त्यानंतर सप्टेंबर २०१९ ला खबरदेणार पुन्हा नाशिक येथे नांदण्यासाठी गेली. पहिला दिवाळीचा सन असल्याने भाउबीजेला ती तिचे नव-यासह तिचे आई-वडीलांकडे आली असता तिचे आईवडीलांनी तिचे नव-याला अर्धा तोळा सोन्याची अंगठी व कपडे देवुन दोन चार दिवसांनी त्यांना नाशिकला पाठविले. नोव्हेंबर २०१९ मध्ये खबरदेणार हिचा सासरा तिचेशी लगट करून लागला व तिचे बरोबर दवाखान्यात तपासणी करण्यासाठी सासु किंवा नवरा न येता तिचे सासरा येत असे. त्यावेळी तिला गाडीवर नेताना तिचा सासरा तिला 'तु मला तुझे नव-यासारखे घट्ट पकडुन बस म्हणजे तु पडणार नाहीस' असे म्हणुन तिला जबरदस्तीने धरून बसण्यास लावायचे व त्यांचे गळयात हात टाकायला लावुन तिचा हात त्यांचे हाताने घ ट्ट धरून ठेवायचे व घरी आल्यावर तिचा हात धरायचे व तिचेशी लगट करायचे. तिचा पदर ओढायचे व तिला जवळ ओढुन तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करायचे. त्यावेळी खबरदेणार हिने तिचे सास-याबाबत तिचे सासुला व पतीला सांगितले असता ते तिला गप्प बसायला सांगुन 'तुझा सासरा जे सांगतो तेच कर' असे म्हणाले. खबरदेणार हिचे नव-याने ती गरोदर असताना देखील तिला मारहाण केली. एक दिवस खबरदेणार एकटी असताना

सास-याने तिला दरवाजा बंद करून जवळ ओढले असता ती मोठयाने ओरडली व मागचे दाराने गॅलरी जिना चढुन वर गेली असता तिथेपण तिचा सासरा तिचे मागे आला. खबरदेणार हिने संध्याकाळी तिचे नव-यास आणि सासुलाही सदर बाब सांगितली असता तेव्हाही त्यांनी खबरदेणार हिला मारहाण केली व दुस-या दिवशी गल्लीतील बायका बोलवुन घेवुन तिला सास-यांचे पाय धरून माफी मागायला लावुन ते मोबाईलमध्ये शुटींग करून घेतली.

खबरदेणार हिचे सास-यांनी लग्न करताना त्यांचा मुलगा कंपनीमध्ये मॅनेजर या पदावर असुन त्याला ४०,०००/- रूपये पगार आहे असे खोटे सांगुन खबरदेणार व तिचे कुटुंबियांची दिशाभुल केली व त्यांची फसवणुक करून लग्न लावले.

दि.१२/०३/२०२० रोजी खबरदेणार हिचे सीझर ऑपरेशन हावुन तिला मुलगी झाली असता तिचा नवरा सदर दिवशी दवाखान्यात येवुन तिला 'मला मुलगी नको होती, मुलगा पाहिजे होता, आता तुला नांदायचे असेल तर तुझे बापाकडुन आपल्याला चारचाकी गाडी घेण्यासाठी रक्कम रू.५,००,०००/- घेवुन ये तरच नांदायला ये' असे म्हणाला. परंतु खबरदेणार हिला नांदायचे असल्याने दि.२३/०७/२०२० रोजी तिची आई व भावासह नाशिक येथे तिचे सासरी नांदण्यासाठी गेली असता त्या वेळेही तिचे सास-यांनी व नव-याने 'तु गाडीसाठी पैसे आणलेस काय' असे म्हणुन पाच लाख रूपयांची मागणी तिचे वडीलांकडे केली असता तिचे वडीलांनी त्यांना 'मी अजुनपर्यंत लग्नाचे कर्ज फेडत आहे, माझी पैसे देण्याची परिस्थीती नाही असे म्हणाले व खबरदेणार हिला तेथेच नांदण्यासाठी सोडले. खबरदेणार नांदत असताना तिचे सासरचे लोकांचे वागण्यात काहीएक बदल झाला नाही व त्यांनी तिला वेगवेगळया प्रकारे त्रास देणे सुरू ठेवले व तिची व तिचे मुलीची उपासमार करत होते. खबरदेणार दि.२६/०९/२०२० ला धोंडयाचे महिन्याला आले तेव्हा तिचे सासुने तिचे दागिणे तिला घालायला दिले नाहीत व तिचे वडीलांनी तिचे नव-याला एक सोन्याची चार ग्रॅमची अंगठी व कपडे केले होते व त्यांना त्यावेळी सारचे सर्व लोकांनी खबरदेणार हिला त्यांचेबरोबर नाशिक येथे न नेता तिला न सांगता नाशिकला निघुन गेले. त्यानंतर पासुन ती तिचे माहेरी राहत आहे. तिने सासरच्या लोकांविरूध्द भरोसा सेल, पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर येथे अर्ज केला परंतु त्याचा काहीएक उपयोग झाला नाही. म्हणुन भरोसा सेल येथील अधिकारी यांनी पुढील कार्यवाहीकरिता खबरदेणार हिला पत्र दिले. म्हणुन खबरदेणार हिने प्रथम खबरी अहवाल नोंदविला.

**३.** खबरदेणार हिने दिलेल्या लेखी तक्रारीस अनुसरून गु.र.क्र.। ६२८४/२०२०, भा.दं.वि. कलम ४९८(अ), ३५४, ४२०, ४०६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये तक्रार नोंदविण्यात आली. तपासीक अंमलदारांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर येथील भरोसा सेल यांचे पत्र व खबरदेणार यांचे लग्नपत्रिका, लग्नाचे फोटो, आधारकार्ड व सोन्याच्या पावत्या प्राप्त केले. फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविला, साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. तपासाअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्याने त्यांचेविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** दि.०२/०८/२०२३ रोजी आरोपी क्र.१ व ३ यांनी अभिलेखावर नि.क्र.५ ला पुरसिस दाखल करून आरोपी क्र.२ हे मयत असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे दि. ०२/०८/२०२३ रोजी निशाणी १ वर आदेश पारित करून आरोपी क्र.२ विरुध्द प्रकरण अबेट करण्यात आले व आरोपी क्र.१ व ३ यांचे विरुध्द प्रकरण पुढे चालविण्यात आले.

**५.** निशाणी १० लगत आरोपी क्र.१ व ३ यांचे विरोधात भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ४२०, ४०६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या शिक्षेस पात्र अपराधाकरिता दोषारोप निश्चीती करण्यात आली. दोषारोप आरोपींना वाचुन समजावून सांगितला असता त्यांनी गुन्हा नाकबुल असल्याचे सांगुन खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

**६.** आरोपींच्या विरोधात गुन्हा केला असल्याबाबत पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रकिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**७.** अभिलेखावर दाखल पुरावा व दोन्ही बाजूंनी मांडलेला युक्तिवाद विचारात घेता निदानासाठी उपस्थित झालेले मुददे, कारणमिमांसा व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे :

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | आरोपींनी संगनमत करून खबरदेणार ही पैशांच्या मागणीची पूर्तता करण्यास अपयशी ठरल्याने तिचा शारीरिक अथवा मानसिक छळ केला, किंवा खबरदेणार | |

| | | |
|---|---|---|
| | हिच्या मानसिक अथवा शारीरिक स्वास्थ्याला इजा होईल अशा पध्दतीने तिचा छळ केला, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | ... नाही. |
| २) | आरोपींनी संगनमत करून खबरदेणार व तिचे कुटुंबियांना आरोपी क्र.१ हा कंपनीमध्ये मॅनेजर या पदावर कामाला असुन त्यास रक्कम रू.४०,०००/- पगार असल्याचे खोटे सांगुन त्यांची दिशाभुल केली व त्यांची फसवणुक करून लग्न लावले, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | ... नाही. |
| ३) | आरोपींनी संगनमत करून खबरदेणार व तिचे कुटुंबियांचा न्यासभंग केला, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | ... नाही. |
| ४) | आरोपींनी संगनमत करून खबरदेणार हिला लाथाबुक्कयांनी मारहाण करून दुखापत केली, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | ...नाही. |
| ५) | आरोपींनी संगनमत करून खबरदेणार हिला अपमानास्पद शब्द उदगारून तिला गुन्हा करण्यास अगर सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रक्षोभित केले, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | ... नाही. |
| ६) | आरोपींनी संगनमत करून खबर देणार हिला जीवे ठार मारण्याची धमकी दिली, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | ... नाही |
| ७) | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार... |

## <u>कारणमिमांसा</u>

८.		अभियोग पक्षाने आपली बाजु शाबीत करण्यासाठी परिशिष्ठ-१, भाग-'क'(अ) मध्ये नमूद साक्षीदारांना तपासले.

९.		सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्या क्र. १ ते ६ करिता.</u>** :-

**१०.** आरोपींच्या विरुध्द गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षास खालील बाबी शंकेच्या पलीकडे जावून सिध्द करणे गरजेचे आहे.

१. आरोपींनी खबरदेणार हिचेकडे पैशांची मागणी केली.
२. खबरदेणार हिने आरोपींची पैशांची मागणी पूर्ण केली नाही.
३. आरोपींनी त्यांची मागणी पुर्ण न झाल्याने खबरदेणार हिला शारीरिक व मानसिक त्रास दिला.
४. खबरदेणार व तिचे कुटुंबियांना आरोपी क्र.१ हा कंपनीमध्ये मॅनेजर या पदावर कामाला असुन त्यास रक्कम रू.४०,०००/- पगार असल्याचे खोटे सांगितले.
५. आरोपींनी खबरदेणार व तिचे कुटुंबियांची दिशाभुल केली व त्यांची फसवणुक करून लग्न लावले
६. आरोपींनी खबरदेणार व तिचे कुटुंबियांचा न्यासभंग केला.
७. आरोपींनी खबरदेणार हिला लाथाबुक्यांनी मारहाण करून दुखापत केली.
८. आरोपींनी खबरदेणार हिला अपमानस्पद वागणूक देवून गुन्हा करण्यास अगर शांततेचा भंग करण्यास प्रक्षोभन दिले.
९. आरोपींनी खबरदेणार हिला जीवे ठार मारण्याची धमकी दिली.
१०. आरोपींचे कृत्य हे संगनमताचे व इच्छापूर्वक होते.

**११.** खबरदेणार अपुर्वा धनंजय साबळे (अ.सा.क्र.१) हिचे पुराव्यात आले आहे की, आरोपी क्र.१ हा तिचा पती असुन आरोपी क्र.२ व ३ हे तिचे सासु-सासरे आहेत. तिचे आरोपी क्र.१ बरोबर २७ जानेवारी २०१९ रोजी श्रीरामपुर येथे डावखर मंगल कार्यालय येथे लग्न झाले व लग्नानंतर ती तिचे सासरी नाशिक येथे नांदावयास गेली. लग्नामध्ये तिला सर्व संसारउपयोगी वस्तु दिल्या होत्या. लग्नानंतर ती, तिचे पती, सासु-सासरे व दीर असे एकत्र राहत होतो. त्यानंतर तिचे सासु-सासरे व पतींनी तिला त्रास देण्यास सुरूवात केली. ते तिचेशी किरकोळ कारणावरून भांडण करत असे. तिला आरोपींनी त्यांनी किरकोळ त्रास दिला म्हणुन तिने पोलीस स्टेशनला जावुन तक्रार दिली दिली असल्याचे सांगितले.

पुराव्यादरम्यान खबरदेणार हिला तक्रार अर्ज दाखविला असता त्यावर असणारी सही तिचीच असल्याचे तिने मान्य केले परंतु त्यातील मजकुर तिला माहित नसल्याचे सांगितले व पोलीसांनी तिची सही तक्रार अर्ज वाचुन न दाखविला घेतली असल्याचे सांगितले.

**१२.** खबरदेणार अभियोग पक्षास सहयोग करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांनी तिला उलटतपासणीचे स्वरूपात प्रश्न विचारून अभियोग पक्षास मदत होईल असा पुरावा अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले.

**१३.** खबरदेणार हिला सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासणीच्या स्वरूपात प्रश्न विचारले असता तिने 'आरोपींनी लग्नामध्ये सर्व भंगार वस्तु दिल्या आहेत असे सांगुन तिला तिचे वडीलांकडुन नवीन वस्तु घेण्यासाठी पैसे घेवुन ये असे सांगितले, तिने माहेरून पैसे आणावेत म्हणुन आरोपी तिला मारहाण करत होते व उपाशी पोटी ठेवत होते, ती गरोदर असताना सर्व खर्च माहेरून आई वडीलांकडुन करून घे असे सांगुन तिला माहेरी पाठविले, तिला तिचे सास-यांनी दुचाकी वाहनावर बसताना 'जसे तु तुझे नव-याला पकडुन बसते तसे मला पकडुन बस' असे म्हणुन स्त्रीच्या स्वाभीमानाला ठेस पोहोचेल असे शब्द उच्चारले, तिचे सासरे हे घरामध्ये असतानाही तिचेशी चांगले वागत नव्हते व त्यांची वर्तवणुक ही स्त्रीला लज्जा निर्माण करेल अशा वागणुकीची होती, ती मी गरोदर असताना तिचे पतीने तिला मारहाण केली, आरोपींनी तिचे पती बॅकेत मॅनेजर आहेत व त्यांना चाळीस हजार रूपये पगार आहे असे खोटे सांगुन तिची व तिचे कुटुंबियांची फसवणुक केली, तिला मुलगी झाल्यानंतर आरोपींनी तिला माहेरून गाडी घेण्यासाठी व इतर वस्तु खरेदीसाठी पाच लाख रूपये आणण्याचा तगादा लावला व ती त्या रकमेची मागणी पुर्ण करू शकली नाही म्हणुन आरोपींनी तिला घराबाहेर हाकलुन दिले' हे सर्व अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न केला परंतु या सर्व बाबी तिने आपल्या पुराव्यात नाकारल्या आहेत व तिने आरोपींच्या विरूध्द भरोसा सेलला तक्रार अर्ज दिली असल्याचे सांगितले परंतु तिथे त्यांचेमध्ये तडजोड झाली नाही म्हणुन तिने पोलीस स्टेशनला तक्रार केल्याची बाब नाकरली आहे.

खबदेणार हिने तिचे पुराव्यात पुढे सांगितले की, तिची व आरोपींची आपसात तडजोड झालेली आहे व तिचे सास-यांचा मृत्यु झालेला आहे. तिची आरोपींविरूध्द कोणतीही तक्रार नाही. तिची आरोपींसोबत तडजोड झाल्याची पुरसिस निशाणी २१ ला दाखल असल्याचे सांगुन तिने त्यातील मजकुर वाचुन समजावुन घेवुन त्यावर सही केल्याचे मान्य केले. त्यामुळे तिला इतर साक्षीदार तपासावयाचे नाहीत व प्रकरण पुढे चालवायचे नाही असे सांगितले.

**१४.** खबरदेणार ही पिडीत असून तिनेच आरोपींनी तिच्याकडे पैशांची मागणी केली, त्यांची मागणी पुर्ण न झाल्याने आरोपींनी खबरदेणार हिला शारीरीक व मानसिक त्रास दिला, तिचे पती कंपनीमध्ये मॅनेजर या पदावर असुन त्यास रक्कम रू.४०,०००/- इतका पगार असल्याचे सांगुन त्यांनी फसवणुक करून लग्न केल्याचे, त्यांचा न्यासभंग केल्याचे तसेच तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे, अगर तिला शिवीगाळ केल्याचे अगर जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे कुठेही सांगितले नाही व तिची व आरोपींची आपसात तडजोड झालेली असल्याचे सांगितले. अशा परिस्थितीत जर का इतर साक्षीदारांचे जबाब जसेच्या तसे वाचले तरी आरोपींविरूद्ध दोषसिध्द होउ शकत नाही. वर नमुद गोष्टींचा विचार करता मला असे वाटते की, अभियोग पक्षाने आपली बाजु शंकेच्या पलीकडे जावुन सिध्द केलेली नसल्याने आरोपी विरूध्दचा दोषारोप हा सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. म्हणून मुद्दा क्र.१ ते ६ चे उत्तर हे नकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.७ करिता</u>** -

**१५.** वर नमुद केल्याप्रमाणे अभियोग पक्ष आपली बाजू शाबीत करणेस असमर्थ ठरल्याने आरोपींना निर्दोष सोडून देणे न्यायाच्या दृष्टीने उचित होणार आहे. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :

## : <u>आदेश</u> :

| | |
|---|---|
| १) | आरोपी क्र.**१. धनंजय संजय साबळे व आरोपी क्र.३.सविता संजय साबळे** यांची फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४९८(अ), ४२०, ४०६, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २) | आरोपींचा जामीन रद्द करण्यात येत आहे. |

MAYA ABHIJEET DESHMUKH
Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH
Date: 2024.04.03 12:17:36 +0530

दि. २१/०३/२०२४.

( माया अ.देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ०७, अहमदनगर.

## <u>परिशिष्ठ-१ भाग 'क'</u>

(फौजदारी नियमपुस्तीका परिच्छेद क्र.४४ (iii) खंड ६ नुसार)

**<u>अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालय यांचे साक्षीदारांचा तपशिल</u> :**

**अ) अभियोग पक्ष :**

| स्थान | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| फि.सा.क्र.१ नि.क्र.२२ | अपुर्वा धनंजय साबळे | फिर्यादी |

MAYA ABHIJEET DESHMUKH Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH Date: 2024.04.03 12:17:26 +0530

( माया अ. देशमुख )
दिनांक:-२१/०३/२०२४.
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०७, अहमदनगर.